MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १४ अंक : ४ पाने : ८ ■ जून-जुलै २०२०
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आजच्या या कठीण परिस्थितीमध्ये माझे अधिकारी व कर्मचारी आपले कर्तव्य बजावून विजेची उपलब्धता सुनिश्चित ठेवण्याची मोलाची कामगिरी पार पाडत आहेत. हे करत असताना या क्षेत्रातील माझ्या अनेक अधिकारी व कर्मचारी बांधवांना कोरोना विषाणूची लागण झाली. त्यातून ते सहीसलामत बरे होऊन पुन्हा कर्तव्यावर रूजू झाले. त्यामुळेच मी माझ्या अधिकारी व कर्मचारी बांधवांना डॉक्टर, परिचारिका, पोलीस यांच्याबरोबरच कोरोना योध्दा म्हणून संबोधितो. या कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे काहींना आपले प्राणही गमवावे लागले, याची मला खंत आहे.

- **अखंड वीजपुरवठा करा**
- **ड्रोनमुळे वाहिन्यांची दुरूस्ती जलदगतीने**
- **सोशल डिस्टन्सिंग पाळा**
- **सूचनांचे काटेकोरपणे पालन करा**

सार्वजनिक सेवांमध्ये आपण येत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेस आपली अविरत सेवा सुरू ठेवणे, हे आपले आद्यकर्तव्य आहे. या कर्तव्याचे आपण सर्वजण पालन करत आहात, याचा मला सार्थ अभिमान आहे.

अधिकारी व कर्मचारी यांच्या सामाजिक सुरक्षितता व जबाबदारी म्हणून आपण तिन्हीही कंपनीत (महानिर्मिती, महापारेषण व महावितरण) जर दुर्दैवाने अधिकारी/कर्मचारी यांचा कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबास ३० लाख रूपये सानुग्रह अनुदान देणार आहोत. ही मदत त्या कुटुंबास कंपनीतर्फे एक आधार म्हणून देण्यात येणार आहे. कंत्राटी कामगार व सुरक्षा रक्षकांनासुध्दा ही मदत मिळणार आहे.

तसेच कंपनीच्या वतीने कोरोना विषाणूच्या विरोधात लढण्यासाठी राज्य सरकारला दोन कोटी रूपयांची मदत सांघिक सामाजिक जबाबदारी निधीतून (CSR) दिली आहे. त्याचबरोबर आपल्या कंपनीत अधिकारी व कर्मचारी यांनी एक दिवसाचे वेतन जमा करून सुमारे साडेतीन कोटी रूपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिले आहेत. अशा प्रकारे, अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून एकूण सुमारे साडेपाच कोटी रूपये आपण कोरोना विषाणूच्या विरोधात लढाईसाठी दिले आहेत.

मला अभिमान आहे की, या कालावधीमध्ये आपल्या कंपनीला Drone based Surveillance करिता केंद्रीय ऊर्जामंत्री कार्यालयाकडून व केंद्रीय नागरी हवाई संचालनालय यांची मान्यता प्राप्त झाली. त्यामुळे ड्रोनव्दारे विद्युत वाहिन्यांची दुरूस्ती व देखभाल होणार आहे. विशेषतः दुर्गम व पहाडी भागात याचा जास्त उपयोग होणार आहे. याबद्दल केंद्र शासनाकडून महापारेषण कंपनीचे अभिनंदन करण्यात आले आहे. याकरिता मी आपल्या सर्वांचे कौतुक करतो. मला आशा आहे की, यापुढेही भविष्यात माझे अधिकारी व कर्मचारी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये अधिक भरीव व चांगली कामगिरी करतील.

महाराष्ट्रात विशेषतः मुंबई, ठाणे, रायगड व कोकणात निसर्ग चक्रीवादळाने धडक दिली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पारेषण व वितरण यंत्रणेवर याचा परिणाम झाला होता. त्यामुळे आपल्या यंत्रणेला मोठी हानी पोहोचली होती. दरम्यान, राज्यातील विविध भागातून आपले अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी येऊन आपली पारेषण यंत्रणा पूर्ववत केली. आपल्या सर्वांचे त्याबद्दल मनःपूर्वक आभार. आपले अधिकारी, कर्मचारी जिद्दीने व देशसेवा या भावनेतून काम करतात, हे यातून जाणवले.

असाच एक अनुभव आपल्या अभियंता/अधिकारी/कर्मचारी यांच्या शौर्याचा पाहण्यास मिळाला. दि. ५ एप्रिल २०२० रोजी रात्री ९ वाजता ९ मिनिटांकरिता दिवे (लाईटस) बंद करण्यात आले. त्यामुळे ग्रीडमध्ये होणारे Frequency Variation आपल्या पध्दतशीर नियोजनामुळे सांभाळण्यात आले. या Frequency Variation मुळे आपल्या प्रणालीवर High व Low Voltage चा पडलेला ताण आपण चांगल्या प्रकारे हाताळू शकलो.

मार्चच्या अखेरीस सुरु झालेले लॉकडाऊन व त्यानुसार आलेले निर्बंध आज थोड्याफार प्रमाणात शिथील करण्यात आले आहेत. मात्र, अजूनही धोका टळलेला नाही. लोकजीवन पूर्ववत होण्याकरिता अजूनही संयम, शिस्तीची गरज आहे. सरकार व कंपनीने दिलेल्या निर्देशांचे कार्यालयात व वैयक्तिक जीवनात काटेकोरपणे पालन करणे



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आवश्यक आहे. त्यामुळेच कोरोना विषाणूवर मात करण्यासाठी आपला हातभार लागू शकतो. या लॉकडाऊन परिस्थितीमध्ये आपल्या महसूल प्राप्तीवर विपरित परिणाम झालेला आहे. त्याकरिता आपण सर्वांनी कंपनीचा खर्च जाणीवपूर्वक कमी केला पाहिजे. जेणेकरून आपल्या कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत राहण्यास मदत होईल.

आपल्या कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता, सॅनिटायझेशन तसेच मास्क, सोशल डिस्टन्सिंग यांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. त्याकरिता योग्य ते नियोजन नियंत्रण अधिकारी यांनी केले पाहिजे. कोरोनाग्रस्त कर्मचाऱ्यांची सोय, उपचार व त्यांच्या कुटुंबियांची काळजी आपल्याला घ्यायची आहे. त्यांना मानसिक आधार देऊन त्यांचा भार व भीती कमी करायची आहे. मला खात्री आहे की, आपण सर्व मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै व त्यानंतरही पुढे एक योध्दा बनून आपले कर्तव्य बजावत राहाल व राज्यात अखंडित वीजप्रवाह ठेवण्यास मोलाचे योगदान देऊ शकाल.

सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक





■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पत्राव्दारे केली मागणी ■

# राज्याच्या ऊर्जा विभागाने केली केंद्राकडे १० हजार कोटींची मागणी

■ *टीम महावितरण/टीम महापारेषण/टीम महानिर्मिती*

लॉकडाऊनच्या काळात महावितरणने ग्राहकांना उत्तम सेवा दिली. तथापि या काळातील वीजबिल भरणा प्रमाण अत्यंत कमी झाल्याने महावितरण आर्थिक संकटात सापडले आहे. याही परिस्थितीत वीज ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे आवश्यक असून महावितरणला त्यासाठी आर्थिक मदतीची अतिशय गरज आहे. ही गरज लक्षात घेऊन राज्याच्या ऊर्जा विभागाने केंद्र सरकारकडे १० हजार कोटी रूपये निधीच्या अनुदानाची मागणी केली आहे. ऊर्जा विभागातील अधिका-यांशी सलग दोन दिवस चर्चा करून राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी एका पत्राव्दारे केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. आर. के. सिंग यांना निधीची मागणी केली आहे.

लॉकडाऊनच्या काळातील वीजबिलांमध्ये सवलत देण्यात यावी, अशी मागणी विविध संघटना व वीजग्राहकांकडून करण्यात येत आहे. लॉकडाऊनच्या काळात सर्वच उद्योग व व्यावसायिक आस्थापना बंद होती. वीजग्राहकही आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. अशाही परिस्थितीत महावितरण ग्राहकांना चांगली सेवा पुरविण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत आहे, असे सांगून ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत म्हणाले की, ``महावितरणच्या एकूण महसूलापैकी सुमारे ६० टक्के महसूल औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांकडून प्राप्त होतो. त्यामुळेच घरगुती आणि कृषी ग्राहकांना क्रॉस सबसिडीच्या माध्यमातून वाजवी दराने वीजपुरवठा करण्यात येतो. कोविड -१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी २२ मार्च रोजी लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. त्यामुळे एप्रिल, मे व जून या कालावधीमध्ये महावितरणच्या महसुलावर मोठा परिणाम झाला.

अत्यावश्यक बाबी जसे की, वीज खरेदी, कर्मचाऱ्यांचे पगार, विविध कर, कर्जाचे हप्ते इत्यादींचा खर्च करणे महावितरणला देणे क्रमप्राप्त आहे. परिणामी महावितरण हे अभूतपूर्व आर्थिक संकटात सापडले आहे. दैनंदिन कामाकरिता महसूलांची उणीव निर्माण झाली आहे. त्याकरिता चालू भांडवल रू. तीन हजार ५०० कोटींचा ओव्हर ड्रॉप घेण्यात आला आहे.

विविध पायाभूत प्रकल्पाकरिता ३८ हजार २८२ कोटींचे कर्ज असून त्यापोटी प्रतिमाह ९०० कोटींचा हप्ता व त्यावरील व्याज देणे क्रमप्राप्त आहे.``

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पुढे असेही सांगितले की, एप्रिल-२०२० पासून वीजनिर्मिती कंपन्यांचे देणे प्रलंबित असून त्याचा आर्थिक डोंगर निर्माण झाला आहे. महावितरणवर या अभूतपूर्व संकटाचे दूरगामी आर्थिक परिणाम झाले आहेत.

महावितरणला यातून उभारी घेण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. तसेच निधी उपलब्धतेबाबत बँक तसेच वित्तीय संस्थांकडून महावितरणला सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. केंद्र सरकारने उपलब्ध केलेले ९० हजार कोटी रूपयांच्या पॅकेजचा लाभ देखील महावितरणला मिळाला नाही.

या सर्व बाबींचा परिणाम महावितरणच्या ग्राहकांवर होत आहे. कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे महावितरणची झालेली गंभीर आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन केंद्र सरकारने १० हजार कोटी रूपयांची आर्थिक मदत अनुदान स्वरूपात द्यावी, अशी मागणी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली आहे.



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

जेजुरी-हिंजेवाडी दुहेरी परिपथ वाहिनी



New Policy

■ नवीन सौरऊर्जा धोरणासाठी उच्चस्तरीय समितीचे गठन ■

# नवे वीजजोडणी धोरण लवकरच : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

राज्यात अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाची प्रामुख्याने सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे. यासंदर्भात ऊर्जा विभागाने शासन परिपत्रक जारी केले आहे. यासंदर्भात राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी निर्देश दिले होते.

ही समिती अपारंपरिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देऊन राज्याचे सर्वसमावेशक ऊर्जा धोरण तयार करून शासनास शिफारस करणार आहे. सौरऊर्जा प्रकल्पासाठी जमिनी उपलब्ध करून देण्यासाठी लँड बँक तयार करण्यात येणार आहे. तसेच कर्नाटक, आंध्रप्रदेश व राजस्थान या शेजारील राज्यातील सौरऊर्जा प्रकल्पांचा अभ्यास करून शासनास शिफारशी सादर करणार आहे.

सौरऊर्जा प्रकल्पासाठी लँड बँक तयार करण्यासाठी लवकरच एका कंपनीची स्थापना करण्यात येणार आहे. याची





संरचना व कार्यप्रणाली या बाबतीत निर्णय घेण्यात येणार आहे. प्रकल्प उभे करण्यासाठी व त्यासाठी असलेल्या आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी एक खिडकी योजना राबविण्यात येणार आहे.

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सौरऊर्जा धोरण निश्चित करण्यासाठी ऊर्जा विभागाला उच्चस्तरीय समितीचे गठन करण्याचे निर्देश विभागाच्या बैठकीत दिले होते.

महावितरण, महापारेषण व महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक तसेच महाऊर्जाचे महासंचालक हे या समितीचे सदस्य राहणार असून ऊर्जा विभागाचे उपसचिव किंवा सहसचिव हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

---

शासन आपल्या पाठीशी

■ राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय ■

# वीज कंपन्यांना २० हजार कोटींची कर्जहमी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

*महानिर्मिती, महापारेषण, महावितरण व एमएसईबी सूत्रधारी कंपन्यांव्दारे २० हजार कोटी रूपयांपर्यंत कर्ज उभारणीसाठी शासन हमी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला.*

*राष्ट्रीय औष्णिक वीज महामंडळ (एनटीपीसी), ऊर्जा पॉवर फायनान्स कार्पोरेशन (पीएफसी) किंवा राष्ट्रीयीकृत बँका आणि वित्तीय संस्था यांच्याकडून ही कर्जे घेण्यात येणार आहेत. कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व उद्योग आणि वाणिज्यिक उपक्रम बराच काळ बंद होते. अजूनही काही प्रमाणात निर्बंध लागू आहेत. सर्वसामान्य नागरिक घरी असल्यामुळे घरगुती वीज ग्राहकांकडून विजेचा जास्त वापर होऊन औद्योगिक ग्राहकांची विजेची मागणी कमी झाली आहे.*


*महाराष्ट्रातील विजेची रोजची सरासरी मागणी २३ हजार मेगावॅटवरून १६ हजार मेगावॅट इतकी कमी झाली आहे. अनुदानित क्षेत्रातील कृषी व घरगुती ग्राहकांची मागणी वाढल्यामुळे महावितरण कंपनीसमोर रोकड सुलभतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आता औद्योगिक*



*प्रक्रिया सुरू होऊन सुस्थितीत येण्यासाठी किमान वर्षभराचा कालावधी लागेल, अशी अपेक्षा आहे.*

*राष्ट्रीयीकृत बँका व इतर वित्तीय संस्थांकडून मध्यम मुदतीचे कर्ज घेतल्यास शासन हमीची गरज भासणार आहे. त्यामुळे ती मिळण्याबाबत ऊर्जा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या हमीसाठी शासनाकडून आकारण्यात येणारे हमी शुल्क माफ करण्याचाही निर्णय घेण्यात आला.*





नवे तंत्रज्ञान

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या पाठपुराव्याला यश ■

# पारेषण वाहिन्यांची पाहणी व देखभालीची कामे आता ड्रोनव्दारे

■ *टीम महापारेषण, मुंबई*

*महापारेषणच्या अति उच्च दाब वाहिन्यांची निगा राखण्याचे काम जसे ग्राऊंड पेट्रोलिंग, टॉवर टॉप पेट्रोलिंग, सर्व्हे आदी कामे ड्रोनव्दारे केंद्रीय नागरी विमान वाहतूक विभागामार्फत परवानगी घेऊन करण्याचा उपक्रम महापारेषणव्दारे घेण्यात आला. यामुळे महापारेषणचा वेळ, पैसा व मनुष्यबळाची बचत झाली आहे. वीज क्षेत्रात ड्रोनव्दारे काम करणारी महापारेषण मात्र देशातील एकमेव कंपनी ठरली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाने नुकतीच पत्रकार परिषद घेऊन महापारेषणच्या उपक्रमाची दखल घेतली आहे. तसेच महापारेषणच्या कामाचा गौरवही केला आहे. दरम्यान, राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केंद्राकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे महापारेषणला हा उपक्रम राबविता आला.*

महापारेषण ही देशातील सर्वात मोठी पारेषण कंपनी आहे. राज्यात ६८१ ईएचव्ही क्षमतेची उपकेंद्रे आहेत.



४८ हजार ३२१ सर्किट किलोमीटरच्या पारेषण वाहिन्या आहेत. १,२८,९९० एमव्हीए क्षमतेची परिवर्तन क्षमता आहे. २५ हजार एमडब्ल्यू ऊर्जा हाताळणीची क्षमता असलेली पारेषण यंत्रणा आहे. विशेषतः दुर्गम भागातून जाणाऱ्या पारेषण वाहिन्यांची कामे करताना ड्रोनचा उपयोग चांगल्या रितीने होत आहे.

महापारेषणच्या पारेषण वाहिन्यांची देखभाल दुरूस्तीचे काम ड्रोनव्दारे करण्यात येत असल्यामुळे ही कामे चांगल्या पध्दतीने व जलद गतीने होण्यास मदत होत आहे. ड्रोनवर व्हिडिओ कॅमेरा व थर्मोव्हिजन कॅमेरा लावला असल्यामुळे पारेषण वाहिन्यांवर निर्माण होणारे विविध दोष त्वरित निदर्शनास आणून त्यांची तात्काळ दुरूस्ती करणे शक्य होत आहे.

विशेषतः नवीन प्रकल्पात सर्व्हेक्षण करण्यासाठीही या ड्रोन कॅमेराचा उपयोग होणार आहे. टॉवरच्या अगदी जवळ जाऊन ड्रोनव्दारे तपासणी होत आहे. त्यामुळे हे डायग्नोस्टिक टूल ठरले आहे. तसेच कार्यालयात बसून ड्रोनची हालचाल पाहणेही शक्य झाले आहे. नियमानुसार ड्रोन उडविण्याची उंची ५० मीटरपर्यंत आहे.

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्यासह महापारेषणच्या सर्व चमूचे कौतुक केले आहे.

Power For All

■ मुंबई व उपनगरातील विद्युत पुरवठ्यात सुधारणा होणार ■

# २२० के. व्ही. बोरीवली-बोईसर लिलो वाहिनी कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, कल्याण*

महापारेषणच्या मुंबई बळकटीकरण प्रकल्पांतर्गत २०१५ मध्ये उभारण्यात आलेल्या २२० के. व्ही. बोरीवली-बोईसर-२ वाहिनीला बोईसरस्थित ४००/२२० के. व्ही. पॉवरग्रीड या उपकेंद्रात लिलो करून २२० के. व्ही. बोरीवली-पॉवरग्रीड-बोईसर लिलो वाहिनीचे काम पूर्ण केले. तसेच ही वाहिनी कार्यान्वित करण्यात आली. या वाहिनीव्दारे मुंबई व उपनगरातील उत्तर व पश्चिम विभागामधील सततची विजेची वाढती मागणी पूर्ण करून विजेचा तुटवडा भरून काढण्यासाठी मदत होणार आहे.

या कामी स्थानिक पातळीवर विविध अडचणी होत्या. परंतु, त्यावर मात करून हे काम युध्दपातळीवर पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे लॉकडाऊनच्या काळात जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून विशेष परवानगी मिळाली. त्यानुसार केंद्र व राज्य सरकारकडून मिळालेल्या सूचना व दक्षतेचे पालन करून लिलो वाहिनीचे काम पूर्ण केले. दरम्यान, २२० के. व्ही. बोरीवली-पॉवरग्रीड वाहिनीचे काम पूर्ण करून वाहिनी कार्यान्वित झाल्यामुळे केंद्रीय विद्युत प्रणालीमधून महापारेषणच्या २२० के. व्ही. बोरीवली उपकेंद्रास २५० ते ३०० मेगावॅट अतिरिक्त विद्युत पुरवठा मिळणार आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्यात अखंड वीजपुरवठा राहण्यास मदत होणार आहे. तसेच ४०० के. व्ही. कळवा आणि ४०० के. व्ही. खारघर येथील रोहित्रांवरील विजेचा भार कमी होण्यास मदत होणार आहे.

हे काम पूर्ण करण्यासाठी अति उच्च दाब वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, कळवा प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. जगन्नाथ चुडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच काम पूर्ण करण्यासाठी अति उच्च दाब प्रकल्प विभाग कल्याणचे कार्यकारी अभियंता श्री. विजय आवारे, प्रकल्प वाहिनी उपविभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. अनिल सुराळकर, सहाय्यक अभियंता श्री. अंशू चौधरी व त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.



बोरीवली: २२० के. व्ही. बोरीवली-बोईसर लिलो वाहिनीचे काम पूर्ण करून कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांच्यासमवेत अधीक्षक अभियंता सर्वश्री. जगन्नाथ चुडे, महेश भागवत, मोरेश्वर ढोरे, अरविंद भगत, विजय आवारे, अनिल सुराळकर व अन्य अधिकारी व कर्मचारी.

सर्वांसाठी वीज

■ कोल्हापूर शहर व शिरोली औद्योगिक वसाहतीत अखंड वीजपुरवठा ■

# ११० के. व्ही. मुडशिंगी-बापट कॅम्प वाहिनी कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, कराड*

लॉकडाऊनच्या काळातही महापारेषणच्या कोल्हापूर विभागातील ११० के. व्ही. मुडशिंगी-बापट कॅम्प वाहिनीचे काम तातडीने पूर्ण करून अति उच्च दाब वाहिनी कार्यान्वित करण्यात आली. यामुळे कोल्हापूर शहर व शिरोली औद्योगिक वसाहतीतील ग्राहकांना अखंड वीजपुरवठा होणार आहे.

११० के. व्ही. मुडशिंगी-बापट कॅम्प वाहिनीचा मार्ग दाट लोकवस्तीतून तसेच शहरालगतच्या ऊस शेतीतून जातो. त्यामुळे वाहिनीचे काम करताना शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यात आली. वाहिनीच्या मार्गामध्ये सात ठिकाणी अति उच्च दाब वाहिन्यांचे क्रॉसिंग आहे. त्याशिवाय राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे यांच्या क्रॉसिंगचाही समावेश आहे. या ठिकाणी विशिष्ट डिझाईनचे म्हणजेच Narrow Base, 25 Mrt extension असे मनोरे वापरण्यात आले.

या प्रकल्पासाठी कराड परिमंडळाच्या मुख्य अभियंता (प्रभारी) सौ. शिल्पा कुंभार, अधीक्षक अभियंता संचलन व सुव्यवस्था श्री. अरविंद दडमल यांनी मार्गदर्शन केले. अति उच्च दाब प्रकल्प विभाग, कोल्हापूरचे कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. दिलीप महाजन यांच्या समन्वय व नियोजनामुळे प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण झाले. या कामासाठी प्रकल्प उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. रवींद्र पावरा, सहाय्यक अभियंता श्री. प्रवीण हेर्लेकर, श्री. विनायक पाटील, श्री. रवींद्र पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रकल्पासाठी मध्य रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग प्रशासन यांनी सहकार्य केले. तसेच ११ के. व्ही./३३ के. व्ही. वाहिन्यांवरील आऊटेजसाठी महावितरण, कोल्हापूर यांनीही मोलाचे सहकार्य केले.




कोल्हापूर : ११० के. व्ही. मुडशिंगी-बापट कॅम्प वाहिनी कार्यान्वित करण्यात आली. याप्रसंगी कराड परिमंडळाच्या मुख्य अभियंता (प्रभारी) सौ. शिल्पा कुंभार, अधीक्षक अभियंता सर्वश्री. अरविंद दडमल, दिलीप महाजन, रवींद्र पावरा, प्रवीण हेर्लेकर, विनायक पाटील, रवींद्र पाटील.

प्रस्तावित वीज विधेयक

■ ऊर्जाविषयक राष्ट्रीय परिषद ■

# सर्व राज्यांना विश्वासात घेऊनच विधेयकात सुधारणा करावी: ऊर्जामंत्री



■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/ टीम महानिर्मिती नागपूर*

केंद्राचे प्रस्तावित वीज सुधारणा विधेयक घटनाविरोधी असून निर्णय घेताना व्यापक विचारविनिमय करण्यात यावा, सर्व राज्यांना विश्वासात घ्यावे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महावितरणला अनुदान स्वरूपात अर्थसहाय्य करावे, अशी आग्रही भूमिका राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केंद्रीय ऊर्जामंत्र्यांच्या एक दिवसीय परिषदेत घेतली.

प्रस्तावित वीज सुधारणा विधेयक २०२० यावर केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने देशातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री-ऊर्जामंत्री यांची व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली. केंद्रीय ऊर्जामंत्री (स्वतंत्र पदभार) श्री. आर. के. सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. या वेळी प्रस्तावित वीज सुधारणा विधेयकाला विरोध करताना हे विधेयक विजेबाबतच्या राज्याच्या अधिकारावर अतिक्रमण करणारे असून त्यामुळे घटनेतील संघराज्याच्या व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या संबंधातील सर्व घटकांशी विचारविनिमय करूनच निर्णय घ्यावा तसेच विविध राज्याच्या प्रस्तावावर सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, अशी मागणी डॉ. नितीन राऊत यांनी केली.

कोरोना काळात सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण करण्याचा सपाटा केंद्र सरकारने लावला असून या विधेयकाच्या माध्यमातून ऊर्जा क्षेत्राचे खाजगीकरण करून खाजगी वीज उद्योगांना मागील दाराने प्रवेश देऊ नये, अशी भूमिका डॉ. नितीन राऊत यांनी मांडली. लॉकडाऊनमुळे महावितरणची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. त्यातून सावरण्यासाठी महावितरणला १० हजार कोटींचे तात्काळ अर्थसाह्य करावे, कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून द्यावे तसेच केंद्राच्या कुसुम योजनेअंतर्गत १ लक्ष सौर कृषीपंप देण्यासाठी केंद्राकडे डॉ. नितीन राऊत यांनी अनुदानाची मागणी केली व त्यास मान्यता देखील देण्यात आली.

महाराष्ट्रात शंभर टक्के सौरऊर्जा करण्याचे उद्दिष्ट नियोजित करण्यात आले आहे. कुसुम योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात यशस्वीरित्या केल्याबद्दल सदर परिषदेत कौतुक करण्यात आले व इतर राज्यांनी महाराष्ट्राकडून प्रेरणा घ्यावी, असे श्री. आर. के. सिंह म्हणाले.

फ्लू गॅस डिसल्फरायझेशन प्रणाली संदर्भात दुसरी बाजू देखील समजून घेणे गरजेचे आहे, कारण या प्रणालीमुळे जिप्सम मोठ्या प्रमाणात निर्माण होऊन त्याची विल्हेवाट लावणे अवघड तथा खर्चिक आहे. जर नजीकच्या परिसरात सिमेंट उद्योग असेल तरच त्याची विल्हेवाट लावणे सोयीचे होणार असल्याचे डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले.

महानिर्मितीकडून वीज उत्पादनासाठी वेकोलीच्या खाणीतून कोळसा खरेदी करण्यात येतो. निर्धारित दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा कोळसा मिळत असल्याने त्याचा वीज उत्पादनावर विपरित परिणाम होतो. वेकोलीतर्फे महानिर्मितीला समर्पित कोळसा खाणी निश्चित करून दिल्या आहेत. त्याकरिता माईन स्पेसिफिक चार्ज अधिकचा लावण्यात येतो व त्याचा आर्थिक भार महानिर्मितीला तसेच वीजग्राहकांना बसत असल्याचे डॉ. नितीन राऊत यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. आर. के. सिंह यांच्या निदर्शनास आणून दिले. या प्रश्नावर केंद्रीय ऊर्जामंत्र्यांनी तातडीने बैठक आयोजित करण्याची मागणी डॉ. राऊत यांना केली व त्यास मान्यता देखील देण्यात आली.

कोविड-१९ काळात अखंडित वीज उत्पादन तथा पुरवठा करण्यात अहोरात्र परिश्रम आणि जोखमीचे काम करणारा वीज अधिकारी-कर्मचारी हा देखील कोरोना वीजयोध्दा आहे. त्यामुळे त्याचे कौतुक होणे गरजेचे असल्याची भूमिका डॉ. नितीन राऊत यांनी मांडली यावर श्री. आर. के. सिंह यांनी सहमती दर्शवून वीज अधिकारी-कर्मचारी यांचे कौतुक झाले पाहिजे, असे सांगितले.

या परिषदेत वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा, सोलर रुफ टॉप योजना, हरित ऊर्जा खरेदीचे बंधन अशा ज्वलंत मुद्यांवर तपशीलवार चर्चा झाली.

थेट-भेट

■ ४४ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्पाची केली पाहणी ■

# महापारेषणच्या काटोल उपकेंद्राला ऊर्जामंत्र्यांची भेट

■ *टीम महापारेषण, नागपूर*

काटोल येथील महापारेषणच्या १३२ के. व्ही. वीज उपकेंद्राला राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी भेट देऊन माहिती घेतली.

संपूर्ण काटोल व नरखेड तालुक्यातील महावितरणच्या ३३ के. व्ही. वीज उपकेंद्रांना येथून वीजपुरवठा होतो. या उपकेंद्राला कळमेश्वरहून वीजपुरवठा होतो. कोणताही तांत्रिक बिघाड झाल्यास संपूर्ण काटोल व नरखेड तालुका अंधारात जातो. अशा अडचणीच्या वेळी पर्यायी मार्गाने वीजपुरवठा करण्यासंदर्भात आवश्यक प्रस्ताव सादर करण्याचे आदेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले.

दरम्यान, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महापारेषणच्या अधिकाऱ्यांकडून कामांची माहिती घेतली. वीजग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्याचे आदेश उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. या केंद्राला मूर्ती येथील ३३ के. व्ही. उपकेंद्र व हेटीकुंडी येथील १३२ के. व्ही. उपकेंद्रातून वीजपुरवठा करण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचेही आदेश त्यांनी दिले. तसेच ऊर्जामंत्री डॉ. राऊत यांनी काटोल-नरखेड मार्गावरील ४४ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्पाची पाहणी केली.

शासन-प्रशासन

■ बुध्दिस्ट थीम पार्क, बिझनेस सेंटर आणि न्यू स्टेडियम प्रस्तावित ■

# कोराडीत ऊर्जा शैक्षणिक पार्क साकारणार : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण नागपूर*

नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथे ऊर्जा शैक्षणिक पार्क, भव्य हनुमान मूर्ती स्मारक, सेल्फी पॉइंट, तलाव सौंदर्यीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. सोबतच फुटाळा तलाव येथे बुध्दिस्ट थीम पार्क, यशवंत स्टेडियम परिसरात जागतिक दर्जाचे अत्याधुनिक नवीन स्टेडियम, वाहन विरहित बिझनेस सेंटर उभारून देश-विदेशातील पर्यटक आणि नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनविण्याचा मानस असल्याचे नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले. महावितरणच्या ऊर्जा अतिथीगृह नागपूर येथे व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित बैठकीत ते बोलत होते.

अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री. अजित पवार यांनी कोराडी येथे ऊर्जा पार्क प्रकल्पाची घोषणा केली होती. त्यानुसार जमीन, पाणी आणि मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध असल्याने नागपूर जवळच्या कोराडी येथे ऊर्जेचे विविध स्त्रोत आणि त्याचा मानवी जीवनाला होणारा उपयोग लक्षात घेऊन शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना यातून हसत-खेळत शिक्षण मिळावे, त्यांना ऊर्जेचे स्त्रोत प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी हाताळता यावेत, सोबतच मनोरंजन व्हावे आणि पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करणे या उद्देशाने हा ऊर्जा पार्क उभारण्यात येणार आहे.

ऊर्जा पार्कव्दारे हरित ऊर्जा, ऊर्जेच्या विविध स्त्रोतांना आधुनिकतेची जोड देण्यात येणार आहे. ऊर्जा वनस्पतींचे उद्यान, सौर विद्युत व्यवस्था, ऊर्जेच्या विविध स्त्रोतांचे जसे औष्णिक, जल, वायू, पवन, सौर, बायोमास लाइव्ह मॉडेल्स, सौर चार्जिंग स्टेशन्स, परिसर सौंदर्यीकरण करून हा अभिनव प्रकल्प प्रस्तावित आहे.




नागपूर : महावितरणच्या ऊर्जा अतिथीगृह येथे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे आयोजिलेल्या बैठकीत बोलताना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, शेजारी माजी मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, माजी राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक, विभागीय आयुक्त श्री. संजीव कुमार, जिल्हाधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, मनपा आयुक्त श्री. तुकाराम मुंढे, रमण विज्ञान केंद्राचे संचालक श्री. विजय शंकर शर्मा.

एकूणच पर्यटकांच्या दृष्टीने भव्य हनुमान मूर्ती उभारून या माध्यमातून पर्यटनाचे हब बनविण्याचे प्रस्तावित आहे.


फुटाळा तलाव येथे जागतिक दर्जाचे बुध्दिस्ट थीम पार्क आणि यशवंत स्टेडियम येथे नवीन स्टेडियम आणि बिझनेस सेंटर उभारण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व प्रकल्पांचा आराखडा प्राथमिक अवस्थेत असून निधीची तरतूद करून सदर प्रकल्प साकारण्याचा मानस डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केला.

या प्रस्तावित प्रकल्पांचे संगणकीय सादरीकरण नागपूरातील प्रसिध्द वास्तूरचनाकार श्री. अशोक मोखा यांनी केले. सादरीकरणानंतर माजी मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, माजी राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक, विभागीय आयुक्त श्री. संजीव कुमार, जिल्हाधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, मनपा आयुक्त श्री. तुकाराम मुंढे, रमण विज्ञान केंद्राचे संचालक श्री. विजय शंकर शर्मा यांची मते जाणून घेण्यात आली तर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक शैला ए., महाऊर्जा संचालक श्री. सुभाष डुमरे, नेहरू विज्ञान केंद्राचे श्री. सूर्यकांत कुळकर्णी, श्री. अशोक जोगदे एफर्ट प्लेनेटोरियम, श्री. रवी बनकर यांनी आपली मते मांडली आणि प्रकल्प विषयक विधायक सूचना देखील दिल्या.




*प्रगतिपथावर असलेली कामे*

जेजुरी-हिंजेवाडी दुहेरी परिपथ वाहिनी



From the Desk of ED, HR

# गुणग्राहकता



गुणग्राहकता हा अतिशय महत्त्वाचा गुण आपल्यामध्ये असेल तर जीवनात त्याचा फार चांगला फायदा आपल्याला होत असतो. गुणग्राहकता म्हणजे समोरच्या माणसाचे चांगले गुण ओळखायचे व ते आपल्यामध्ये उतरवण्याचा प्रयत्न करायचा. त्याकरिता माणसातील गुणांवर लक्ष केंद्रीत करायचे. तो माणूस कोण आहे? त्यावर हे ठरत नाही. सर्वसामान्य व्यक्तीपासूनसुध्दा आपण अनेक चांगले गुण आत्मसात करू शकतो. तोच व्यक्ती जीवनाचा खरा आनंद घेऊ शकतो. जो अनेक गुणसंपादन करतो. गुणांना मर्यादा घालण्याची आवश्यकता नाही. चांगले लिखाण, वाचन, वादन, गायन, नृत्य, हस्तलिखीत, पठण, कीर्तन अशा अनेक कला आपण आत्मसात करू शकतो. काही विद्वान तर असे असतात ज्यांचे अनेक भाषेवर प्रभुत्व असते. भारतीय भाषांबरोबरच आंतरराष्ट्रीय भाषासुध्दा त्यांना अवगत असतात. जोपासणारा प्रत्येक गुण आपल्याला जीवनात कुठेतरी उपयोगी पडत असतोच.

ग्राहकता म्हणजे काय तर आपल्यामध्ये चांगले गुण अंगीकारणे. विद्याविभूषित असून ज्ञान अंगीकृत करू शकलो नाही तर व दैनंदिन जीवनात आचरण करण्यास आपण असमर्थ ठरलो तर त्या ज्ञानाच्या उपयोगापासून आपण वंचित राहतो.

ग्राहकता जोपासण्यासाठी सुक्ष्म निरीक्षण व सराव अतिशय महत्त्वाचा ठरतो. अनेक चांगले गुण आपण सुक्ष्म निरीक्षणाने अंगीकारू शकतो. सराव त्या गुणांस पूर्णत्वास नेण्यास मदत करतो. अनेक वेळा आत्मसात केलेला गुण सरावाच्या अभावामुळे आपल्यातून निघून गेलेला असतो. त्यासाठी नियमितपणे सराव आवश्यक आहे.

जीवन विशाल आहे. प्रत्येक दिवस आपल्याला नवीन चेतना, ऊर्जा व वेगळा काहीतरी अनुभव देत असतो. आपला प्रवास भूतकाळाला कापत वर्तमानात व त्यातून भविष्यकाळात होत असतो. त्यामुळे वर्तमानात जगताना आपला प्रत्येक दिवस फलदायी व प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर नेता आला पाहिजे. जीवन सुंदर आहे. त्याकरिता सतत जीवनाचा आस्वाद घेण्याकरिता जर आपण अनेक चांगले गुण आत्मसात केले तर त्यापासून आपल्याला विलक्षण आनंद प्राप्त होईल. स्वतःची स्पर्धा आपल्याला स्वतःबरोबरच करायची आहे. `कल और आज` यामध्ये आपल्याला फरक नक्कीच घडवायचा आहे. अनेक चांगल्या गोष्टी शिकायच्या आहेत. ही शिकण्याची क्रिया अविरतपणे व निरंतर सुरू ठेवायची आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही म्हटले आहे की, `माणूस हा आजन्म विद्यार्थी आहे`. त्यामुळे माणसाने जीवनात नेहमीच नवीन चांगल्या गोष्टी शिकल्या पाहिजेत, तरच खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान लाभेल.

अनेकांचे चांगले अनुकरण करून आपण स्वतःला घडवू शकतो. निरीक्षण व गणन त्याकरिता मोलाची साथ देते. जो सर्वगुणसंपन्न तो जास्त समाधानी. त्यासाठी आपण सर्वजण निर्धार करूयात की, आजपेक्षा आपला उद्याचा दिवस नक्कीच चांगला व वेगळा बनवेन.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.